जा. क्र. : माध्य-३/प्रथम मान्यता/पुवि/१९९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - ४११ ००१, यांचे कार्यालय.
दिनांक :- 16 AUG 1993

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद पुणे

विषय :- प्रथम मान्यता
रयत शिक्षण संस्था संचलित न्यू. इ. स्कूल असाणे ता. आंबेगाव

संदर्भ :- आपले पत्र जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९२.९३
दिनांक २९.५.९३

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये रयत शिक्षण संस्था संस्थेच्या मराठी माध्यमिक शाळेच्या इ. ८ वी/९वी./१०वीच्या वर्गास सन १९९१ - १९९२ या शैक्षणिक वर्षासाठी /सन १९९१.९२पासून प्रथम मान्यता / मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याचाही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३]

स्थळप्रतीवर सि. ए. नं. यांची
सही असे

प्रत:-
मुख्याध्यापक
न्यू. ईंग्लिश स्कूल असाणे
ता. आंबेगाव जिल्हा पुणे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता